# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 16 July 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १६ जूलै २०२५ दुपारी १.०० वा.**

****

येत्या २१ तारखेपासून सुरु होणाऱ्या संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने येत्या रविवारी २० तारखेला सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज सुरळीत चालावं यासाठी सरकार सर्व राजकीय पक्षांकडून सहकार्य मागणार आहे. हे अधिवेशन पुढील महिन्याच्या २१ तारखेपर्यंत चालेल. अधिवेशनादरम्यान अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर चर्चा होऊन ते मंजूर होण्याची शक्यता असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने ड्रोन आणि इतर मानवरहित शस्त्र प्रणालींचा वापर केला होता, जे भारतीय सशस्त्र दलांनी निष्क्रिय केल्याची माहिती संरक्षण दल प्रमुख अनिल चौहान यांनी दिली. मानवरहित हवाई वाहने आणि काउंटर-यूएएस स्वदेशीकरण या विषयावरील कार्यशाळेला ते आज नवी दिल्लीत संबोधित करत होते. ऑपरेशन सिंदूरमुळे स्वदेशी संरक्षणाच्या मानवरहित हवाई प्रणाली तैनात करण्याचं महत्त्व स्पष्ट झाल्याचं सांगून देशाच्या सुरक्षेसाठी संरक्षण क्षेत्रात गुंतवणूक आणि उत्पादनावर अधिक लक्ष केंद्रीत करण्याची गरज असल्याचं चौहान यांनी नमूद केलं.

****

राज्यात लोक बेपत्ता होण्याच्या घटना वाढत असून बेपत्ता झालेल्या लहान मुलांचा शोध घेण्यासाठी ऑपरेशन मुस्कान, महिलांसाठी ऑपरेशन शोध अशा दोन मोहिमा राबवण्यात येत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत सांगितलं. लोक बेपत्ता झाल्याच्या प्रकरणांचा तपास मागे पडू नये यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात Missing Cell स्थापन करण्यात आली असून, महिला अधिकाऱ्याकडे याची जबाबदारी असेल, असंही फडणवीस म्हणाले. यावर, विरोधी

पक्षनेते अंबादास दानवे यांनी, याकडे सामाजिक जबाबदारी म्हणून पाहण्याची गरज अधोरेखित केली.
भरोसा सेलद्वारे महिलांना सगळ्या समस्यांचा उपाय एका ठिकाणी देण्याचा सरकारचा प्रयत्न असून सापडलेल्या महिलांसाठी समुपदेशन केंद्रं वाढवण्याचाही विचार करू, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

मुंबई लोकलमध्ये प्रवास करताना गेल्या तीन वर्षांत साडे सात हजारापेक्षा जास्त जणांचा जीव गेला असून, सुमारे सात हजार ३०० जण जखमी झाले असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभेत दिली. गेल्या महिन्यात मुंब्रा-कळवा स्थानकांदरम्यान दोन लोकलमधले प्रवासी एकमेकांना धडकून झालेल्या अपघाताबद्दल आमदार अतुल भातखळकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. सरकारी कार्यालयांप्रमाणेच खासगी आस्थापनांच्या वेळेत बदल करून लोकलवरचा भार कमी कसा करता येईल, याचा अभ्यास करण्यासाठी कृती दल स्थापन करण्याचं आश्वासन सरनाईक यांनी दिलं.

****

चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती तालुक्यातल्या १४ गावांचा महाराष्ट्रात समावेश करण्याचा ऐतिहासिक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती दिली असून, लवकरच अंतिम निर्णय होणार असल्याचं सांगितलं. या गावांबाबत गेल्या अनेक वर्षांपासून सीमावादामुळे तेलंगणा की महाराष्ट्र, असा संभ्रम होता. या निर्णयामुळे सीमाभागातल्या गावांचा प्रश्न मार्गी लागेल.

****

लोकमान्य टिळक यांचे पणतू, 'केसरी'चे विश्वस्त संपादक आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलपती डॉ. दीपक टिळक यांचं आज पहाटे पुण्यात निधन झालं, ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर आज वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.
लोकमान्य टिळक यांचा राज्याच्या समाजकारणातील विविधांगी क्षेत्रातील वारसा समर्थपणे चालवणारे लोकाभिमुख, मार्गदर्शक असं व्यक्तिमत्व डॉ. दीपक टिळक यांच्या निधनामुळे अनेक सामाजिक संस्थांचा आधारस्तंभ हरपला आहे, अशा शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनीही दीपक जयंत टिळक यांना श्रद्धांजली अर्पण केली.

****

निती आयोगाच्या ‘विकसित महाराष्ट्र–२०४७‘ उपक्रमाच्या अनुषंगाने दिव्यांग कल्याण विभागाचा सर्वांगीण आणि दीर्घकालीन विकास आराखडा तयार करण्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन केली आहे. यासंदर्भातला शासन निर्णय जारी करण्यात आला. या समितीमध्ये लातूरच्या डॉ.प्रिती पोहेकर यांचा सदस्य म्हणून समावेश करण्यात आला आहे. दिव्यांगांसाठी केलेल्या कार्याबद्दल राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त पोहेकर या समदृष्टी क्षमता विकास तथा संशोधन मंडळ – सक्षमच्या राष्ट्रीय सदस्य आहेत.

****

लातूर जिल्ह्यातल्या एकुर्गा गावातल्या जिल्हा परिषद शाळेत आठवीच्या वर्गाला मान्यता नसल्यामुळे शाळेतल्या १०० हून अधिक विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याच्या दालनाबाहेर काल ठिय्या आंदोलन केलं. विद्यार्थ्यांच्या या आंदोलनाला यश आलं असून, शिक्षणाधिकाऱ्यांनी या शाळेत आठवीच्या वर्गाला मान्यता देत असल्याचं पत्र दिलं.

****

बुलढाणा जिल्ह्यात चिखली इथं आयशर ट्रकमधून ८० लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी मध्य प्रदेशातला चालक सईद खान राशीद खान याला अटक केली असून, मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला.

****

इंग्लंड दौऱ्यावर गेलेल्या भारतीय महिला क्रिकेट संघाच्या इंग्लंडविरूद्ध तीन एकदिवसीय क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. आजचा पहिला सामना साऊदॅम्टन इथं भारतीय प्रमाण वेळेनुसार सायंकाळी साडेपाच वाजता सुरू होईल